मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १८० ■ गुरुवार, ०२ ऑक्टोबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४+२






## जिल्ह्यात पॉलिटिक्स



# थंडा थंडा कुल कुल ; राजकारणी गारठले... इच्छुक भांबावले

**सांगली : हॅलो प्रभात**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उंबरठ्यावर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री जयंतराव पाटील आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यातील झटापट पाहता संघर्षाचा आग डोंग जिल्ह्यात उसळेल असा जो अंदाज बांधण्यात येत होता तो फोल ठरला आहे. निवडणूक प्रक्रिया जसजशी जवळ येईल तसं तसे राजकीय वातावरण अधिकच तापत जाईल असा अंदाज प्रारंभीच्या काळात आ.जयंत पाटील आणि हा गोपीचंद पडळकर यांच्यातील शाब्दिक चकमकीनंतर आणि या दोघांच्या समर्थकांनी रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवल्यानंतर वातावरण अधिकच स्फोटक बनत जाईल असा कयाय सर्वसामान्य नागरिकांनीदेखील बांधला होता, परंतु जसजसे दिवस जात जातील तस तसे सांगली जिल्ह्यातील राजकारण शांत होत आहे. नेत्यांच्या या मवाळपणाबद्दल इच्छुक मात्र चांगलेच भांबावले आहेत. मांडवलीचे राजकारण केले जात आहे का ? असाही सुरू राजकीय जाणकारांमधून काढला जात आहे.

अगोदर आरक्षणाच्या मुद्द्यावर निवडणूक सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर निकालाला भरपूर वेळ काढला गेला. प्रत्येक वेळी पुढील तारखेला निकाल लागेल अशी अपेक्षा गृहीत धरून इच्छुकांनी आपल्या तिजोरीला कुलूप लावायचेच सोडून दिले होते. याच काळात प्रभागातील वयोवृद्धांना देवदर्शनाचा मोफत लाभ घेता आला. तर कार्यकर्ते निवडणुकीत आपल्यामागे ठामपणे उभे राहावेत यासाठी ढाब्यावर सांगून ठेवण्यात आले होते. न्यायालयाच्या निकालाला अपेक्षेपेक्षा अधिक काळ लागल्यामुळे इच्छुकांची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली आहे, त्यामुळे त्यांनी आपली नजर आता नेत्यांवर रोखली आहे. मात्र इच्छुक उमेदवार भांबावून गेले आहेत. फ्सर्वोच्च न्यायालयने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास हिरवा कंदील दाखविल्यानंतर मग मात्र पुन्हा धावपळीला प्रारंभ झाला होता. परंतु राजकीय स्थिती पूर्णपणे बदलून गेली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी गणेशोत्सव सोहळा येऊन गेला, आता त्यानंतर दिवाळी येत आहे, त्यामुळे इच्छुक उमेदवार आता गलीतगात्र झाले असून त्यांनी दिवाळीचा चांगलाच धसका घेतलेला दिसत आहे. दिवाळीसाठी दारात आलेल्यास नाराज करता येत नाही आणि मतदार नाराज झाला मत मागण्यासाठी त्यांच्या दारात जाता येत नाही अशा द्विधा मन::स्थितीत इच्छुक पेचात सापडले आहेत. सांगली महापालिका निवडणूकीसाठी महायुतीतील घटक पक्षांचा जागा वाटपाचा प्रश्न भाजपाच्या चांगलाच अंगाशी येणार आहे, ७८ सदस्यांच्या सांगली महापालिकेसाठी भाजपाकडे आताच ९० पेक्षा अधिक इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. मित्र पक्ष राष्ट्रवादी आणि शिवसेनेला जागा वाटप भाजपकडून कसे केले जाणार हा मुद्द्याचा प्रश्न सध्या सांगलीतील राजकीय वतुळात चर्चेचा विषय बनलेला आहे. भाजपची भूमिका काहीही असो, अजितदादांच्या राष्ट्रवादीने ताकदीने निवडणूक मैदानात उतरण्याची तयारी ठेवलेली आहे. शिंदेसेनेची बाजू मात्र याबाबत कमकुवत आहे. त्यामुळे यदा कदाचीत स्व:बळाची भाषा झालीच, तर मात्र शिंदेसेनेचे इच्छुक सैरभैर होऊन त्याचा फटका भाजपला बसण्याची शक्यता राजकीय वतुळात वर्तवली जात आहे.

महायुती प्रमाणेच महाविकास आघाडीमध्ये देखील सर्व काही आलबेल नसल्यामुळे आता तरी शांत बसणेच ठिक आहे असा विचार सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी केल्याचे सध्यातरी दिसून येत आहे. सांगलीप्रमाणेच कोल्हापूर महापालिकेची स्थिती आहे. २०१८ च्या महापालिका निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीने कोल्हापूर महापालिकेची सत्ता आपल्या हाती खेचून आणली होती. आता काँग्रेसची २०१८ च्या निवडणुकीतील ताकद कोल्हापुरात शिल्लक राहिलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये उभी फूट पडून, दोन राष्ट्रवादी झाल्या. त्यातील अजितदादांच्या राष्ट्रवादीची सुत्रे मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हातात आहेत. २०१८ च्या निवडणुकीत काँग्रेस नेते माजी मंत्री सतेज पाटील आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी केवळ कोल्हापूर महापालिकेतीलच नव्हे तर कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतांश सहकारी संस्थांमधील सत्ता काँग्रेस आघाडीकडे खेचून आणून महाडिक यांच्या सत्तेला सुरुंग लावला होता. यावेळी मात्र महाडिक आणि मंत्री हसन मुश्रीफ एकत्र आहेत, तर सतेज पाटील हे प्रतिस्पर्धी म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. राजकारणात संपूर्ण सावळा गोंधळ झाला असल्यामुळे कोणत्याच पक्षाच्या नेत्याला आत्मविश्वास राहिल्यासारखी स्थिती नाही. त्यामुळे सांगली व कोल्हापूर महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर नेत्यांनी मौन पाळून पुढील परिस्थितीवर नजर ठेवण्याची भूमिका घेतली असल्याची दिसून येत आहे.

## उद्याचा अंक बंद

आज ०२ ऑक्टोबर रोजी विजयादशमी (दसरा) निमित्त दैनिक 'हॅलो प्रभात'च्या कार्यालयास सुट्टी असल्याने उद्याचा दिनांक ०३ ऑक्टोबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही, याची आमचे वाचक, जाहिरातदार व हितचिंतक या सर्वांनी नोंद घ्यावी.

– संपादक

# 'शिवप्रताप' तर्फे सभासदांना दुहेरी लाभांश वाटप

### सहकार क्षेत्रात संस्थेने निर्माण केला नवा आदर्श

**विटा : हॅलो प्रभात**



येथील प्रथितयश शिवप्रताप मल्टी स्टेट नागरी को-ऑप. क्रेडिट सोसायटीने पुन्हा एकदा सभासदांप्रती आपली बांधिलकी सिद्ध करत सहकार क्षेत्रात नवे पर्व निर्माण केले आहे. संस्थेने यंदा सभासदांना दुहेरी लाभांश वाटपाचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. या दुहेरी लाभांश वाटपाचा शुभारंभ संस्थेच्या मुख्य कार्यालयात थाटात पार पडला. यावेळी संस्थेचे संचालक व युवा उद्योजक सतिश साळुंखे आणि कार्यकारी संचालक अॅड. विठ्ठल साळुंखे यांच्या हस्ते लाभांश वितरणास सुरुवात झाली. शिवप्रताप मल्टीस्टेट ही दुहेरी लाभांश देणारी पहिलीच संस्था ठरली असून, या उपक्रमामुळे सहकार क्षेत्रात संस्थेने एक नवा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेच्या प्रवासात हा निर्णय केवळ आर्थिक नव्हे तर सभासदहिताचा मानला जात आहे.

या प्रसंगी सभासद सूर्यकांत मेटकरी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, दुहेरी लाभांश हा केवळ आर्थिक मदत नसून आमच्या विश्वासाला दिलेला मान आहे. आज शिवप्रताप मल्टीस्टेटने पुन्हा एकदा दाखवून दिले की संस्था ही केवळ ठेवी-कर्जासाठी नाही तर सभासदांना त्यांच्या घामाच्या थेंबांचे खरे मूल्य देणारी विश्वासाची शिदोरी आहे. दुहेरी लाभांशामुळे संस्थेचे नाव सहकार क्षेत्रात सुवर्णअक्षरांनी लिहिले जाणार यात शंका नाही.

कार्यक्रमाला लक्ष्मी बेकरीचे राजू किनाती,मुळीक ज्वेलर्सचे भरत मुळीक उपस्थित होते. या उपक्रमाचे सभासद, ग्राहक, महिला वर्ग, हितचिंतक यांनी स्वागत केले असून, शिवप्रताप मल्टीस्टेटची सभासद हिताची ओळख आणखी दृढ झाली आहे.

# डॉ.शिवाजीराव कदम कॉलेज येथे गुणवंत प्राध्यापकांचा सत्कार

**सांगली : हॅलो प्रभात**



कसबे डिग्रज येथील तीर्थंकर एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. शिवाजीराव कदम कॉलेज ऑफ फार्मसी येथे गुणवंत प्राध्यापकांचा विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थापक प्राध्यापक डी.डी. चौगुले यांना ए.पी.टी.आय.मुंबई यांच्यातर्फे फार्मसी शिक्षणातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सर्वोत्तम शिक्षक, प्राचार्य व संस्थापक

हा विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन रावसाहेब पाटील यांनी सत्कार केला. डॉ.संतोष गेजगे यांची हार्वर्ड विद्यापीठ अमेरिका येथे शिष्यवृत्तीसह पेटंट अभ्यासक्रम ासाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉ.बाळासाहेब चोपडे यांनी विशेष अभिनंदन केले.

डॉ.अजित दळे विभाग प्रमुख रसायनशास्त्र यांनी अल्झायमर्स व्याधीवर नवीन रसायने औषधे शोधून काढून त्याची पाच भारतीय पेटंट पब्लिश केल्याबद्दल व्हा. चेअरमन पोपटराव डोरले यांनी विशेष कौतुक केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव अजित पाटील, खजिनदार मिलिंद भिलवडे, संचालक महावीर चौगुले, प्रशांत अवधूत, नितीन चौगुले व अजित फराटे उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्याहस्ते वृक्षारोपण



**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील प्रांगणात संविधान स्तंभानजीक वृक्षारोपण केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे,

उपजिल्हा निवडणूक अधिकारी नीता शिंदे, उपजिल्हाधिकारी (महसूल) राजीव शिंदे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजया यादव, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सर्वश्री अजय पवार, शिवाजी जगताप, विवेक काळे व तहसीलदार सर्वसाधारण लीना खरात आदि उपस्थित होते.

# कोणतेही गोष्ट अशक्य नाही : सचिन पाटील

### शरद इंजिनिअरिंगमध्ये फोल्क्स फेस्टचे उद्घाटन

**यड्राव : हॅलो प्रभात**



कोणतेही गोष्ट अशक्य नाही, जर तुम्ही ठरवली तर.. जीवनात प्रत्येकाने आपले ध्येय ठरवायला हवे, तरच योग्य दिशा मिळेल. त्यामुळे जर्मन भाषा शिकायचं असेल तर ते मनापासून शिका. जागतिक कंपन्यामध्ये याचा खूप मोठा फायदा आहे. असे प्रतिपादन पुणे येथील टेकॉविंग्स ॲटोमेटेड इंडिया कंपनीचे डायरेक्टर सचिन पाटील यांनी केले. ते शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील फोल्क्स फेस्ट या स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे होते.

श्री.पाटील पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांना मूलभूत गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. अर्धे ज्ञान धोकादायक आहे. कोणत्याही क्षेत्रात स्वत:ची ओळख निर्माण करायला हवे. कॉलेजना विद्यार्थ्यांना संधी निर्माण करुन दिली आहे. ते कौशल्य आत्मसात करुन त्याचा आपल्या करिअरसाठी उपयोग करा. यावेळी स्वागत इव्हेंटचे समन्वयक प्रा. अंकिता माने यांनी केले. सूत्रसंचालन अदिती काळे व जेबा खाखु यांनी केले. आभार अखिल मुजावर, केदार कुलकर्णी यांनी मानले.

# डोंगराई देवी मंदिर परिसर सुशोभीकरण काम निकृष्ट दर्जाचे

### पृथ्वीराज देशमुख यांनी वनमंत्र्यांकडे केली कामाची तक्रार

**कडेगाव : हॅलो प्रभात**



येथील तीर्थक्षेत्र 'श्री डोंगराई मंदिर परिसर' सुशोभिरकण करण्याचे काम वन विभागामार्फत सध्या सुरू असून सुशोभीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, कामाची चौकशी करून तातडीने हे काम दर्जेदार करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनी वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्याकडे केली आहे.

याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डोंगराई मंदिर परिसर सुशोभीकरण करण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असून त्याबाबत संबंधित अधिकारी कंत्राटदार यांना वेळोवेळी सूचना देऊनही कसल्याही प्रकारची सुधारणा झालेली नसून सदर कामाची क्वालिटी कंट्रोल विभागाकडून तपासणी होऊन दोषींवर शासन नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याची मागणी माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांनी केली आहे.

# पूरग्रस्तांसाठी सांगलीतून मदतीचा मोठा हात

### आ.सुधीर गाडगीळ यांच्या पुढाकार

**सांगली : हॅलो प्रभात**




सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्या. त्यामुळे अनेक गावांमध्ये पाणी शिरून शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले.

नागरिकांच्या घरातील धान्यसाठा, कपडे, शाळकरी मुलांचे साहित्य वाहून गेले असून शेतकऱ्यांच्या पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या बिकट परिस्थितीत सांगली जिल्ह्यातून मदतीचा मोठा हात पुढे करण्यात आला आहे.

आ. सुधीर गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सुधीर गाडगीळ युवा मंच, सांगली जिल्हा तर्फे ५०० अन्नधान्य किट्स, तसेच २५० चादरी व २३० चटई तसेच सांगली चेंबर ऑफ कॉमर्स,

सांगली तर्फे ३०० अन्नधान्य किट्स, चादरी व चटई असे एकूण ८०० अन्नधान्य किट्स, तसेच ५०० चादरी व ५०० चटई असे पूरग्रस्तांसाठी मदत सामग्री पाठविण्यात आली. या मदतीमुळे पूरग्रस्तांना तातडीचा दिलासा मिळणार आहे.

यावेळी आ.गाडगीळ,माजी आमदार दिनकरतात्या पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, ज्येष्ठ नेते प्रकाश बिरजे, भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पृथ्वीराज पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

**पुणे : हॅलो प्रभात**




अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा शुभारंभ संस्थेच्या सरचिटणी प्रमिला गायकवाड, संयुक्तचिटणीस वासंती बोर्डे, खजिनदार अॅड. भगवानराव साळुंखे, धैर्यशील वंडेकर, प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना सतर्क राहून वाटचाल केली पाहिजे. यशाला शॉर्टकट नसतो, जिद्द मेहनत अभ्यासात सातत्य असेल तर यश निश्चित मिळतेच. स्वतःमधील इच्छा शक्तीला कठोर परिश्रमाची जोड दिल्यास आपण आपले इच्छित ध्येय कोणत्याही परिस्थितीत सहज साध्य करु शकतो. अभ्यासाबरोबर सर्वांगीण विकास साधण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रमात,खेळामध्ये सहभाग, व्यायाम, वाचन,सकस आहार याकडे लक्ष ध्यावे. मोबाईलच्या आहारी न जाता तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या शास्वत विकासासाठी करा असे प्रतिपादन या प्रसंगी केले.

वासंती बोर्डे यांनी जीवनामध्ये यश संपादन करावयाचे असेल वेळेचे योग्य व्यवस्थापन करून सातत्यपूर्ण प्रयत्न करा असे प्रतिपादन या प्रसंगी केले. अॅड.भगवानराव साळुंखे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासेतर उपक्रमामध्ये सहभाग घेऊन व्यक्तिमत्व विकास,खेळातील प्राविण्य, संभाषण कौशल्य वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत असे सांगून मार्गदर्शन केले. धैर्यशील वंडेकर यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबर प्रात्यक्षिक ज्ञान, टीमवर्क, संभाषण कौशल्य शिवाय विषयातील प्राविण्य, सखोल अभ्यास, सादरीकरण कौशल्य प्राप्त केल्यास आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळिवता येईल असे मार्गदर्शन केले.

यावेळी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी परीक्षेत टॉपर आलेले महारुद्र बर्डे, एन. प्रीती, यश हर्चे, शिवं भुसारी, कार्तिक गवळी व चतुर्थ वर्ष अभियांत्रिकी परीक्षेत टॉपर आलेले चारुदत्त ठाकरे,ओम कांचन, सागर भंडारे, ईश्वरी घोगरे, अनघा शिर्के, साक्षी व्यवहारे यांचे व ज्यास्तीत ज्यात विद्यार्थ्यांनी ग्रंथालय सेवांचा वापर केल्याबद्दल बेस्ट लायब्ररी युझर अवार्ड ने साक्षी माळी व तनिष्क अग्रवाल यांना सन्मानित करण्यात आले. खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळिवल्याबद्दल विद्यार्थ्याचा सत्कार करून कौतुक करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांनी महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध संशोधन प्रकल्प, सेंटर ऑफ एक्सलन्स,विविध विद्यार्थीभिमुख उपक्रम यांची ओळख करून दिली. प्रथमवर्ष अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. बालाजी शेलुकर यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

सदर समारंभास संस्थेच्या सरचिटणीस मा.प्रमिला गायकवाड, संयुक्तचिटणीस मा.वासंती बोर्डे, खजिनदार अॅड. भगवानराव साळुंखे, धैर्यशील वंडेकर, प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे, डॉ.बालाजी शेलुकर, सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गायत्री कांबळे यांनी केले तर प्रा.मोनिका जगताप यांनी आभार मानले.

